महाराष्ट्र शासन

विभागीय सहसंचालक , उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल

शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसर, पनवेल, जि.रायगड - ४१० २०६.

ई-मेल पत्ता :- jtdire.१११५@gmail.com दूरध्वनी व फॅक्स नंबर (०२२-२७४६१४२०)

जा.क्र.: विससं/उशि/कोविप/परदेशी शिष्यवृत्ती योजना/शिष्यवृत्ती/२०२३-२४/२०२८ दि.०३.०७.२०२२

परिपत्रक

प्रति,

प्राचार्य / शैक्षणिक संस्था प्रमुख,

सर्व अधिनस्त कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, अध्यापक व शारिरीक शिक्षण शास्त्र महाविद्यालये,

जि.: ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग.

विषय: उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत खुल्या "प्रवर्गातील गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी " या योजनेंतर्गत शिष्यवृत्तीच्या पदव्युत्तर पदवी व पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमाच्या जागांच्या संख्येत वाढ झाल्याबाबत...

संदर्भ:1. शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक : संकीर्ण -2018/प्र.क्र.218/ताशि-4, दि. 04 ऑक्टोबर,2018

2. शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक : बैठक--2022/प्र.क्र.188/ताशि-4, दि. 31 जुलै,2023

3 .मा. संचालक, तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. 17/तंशिसं/परदेशी शिष्यवृत्ती/2023/208, दि. 03 ऑगस्ट, 2023.

उपरोक्त विषयास अनुसरुनसुचित करण्यात येते की, महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा संदर्भ क्र. 1 च्या दि. 4 ऑक्टोबर, 2018 च्या शासन निर्णयान्वये उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृती योजना जाहीर करण्यात आलेली आहे. सदर योजना शैक्षणिक वर्ष 2018-19 पासून राबविण्यात आली असून, या योजनेंतर्गत महाराष्ट्र राज्यातील खुल्या प्रवर्गातील जे गुणवंत विद्यार्थी पदव्युत्तर पदवी, पदव्युतर पदविका व पीएच.डी अभ्यासक्रमासाठी, THE (Times Higher Education) किंवा QS (Quacquarelli Symonds) Ranking 200 च्या आतील असलेल्या परदेशातील शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेतील, अशा 20 विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी परदेशी उच्च शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृती मंजूर करण्यात येते होती.

त्या अनुषंगाने शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक पशियो 2023/प्र.क्र.50/ताशि-4, दि. 29 मे,2023 अन्वये शैक्षणिक वर्ष 2023-24 मध्ये राबविण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे.

आता शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक : बैठक--2022/प्र.क्र.188/ताशि-4, दि. 31 जुलै,2023 अन्वये वर्ष 2023-24 पासून या शिष्यवृत्तीच्या पदव्युत्तर पदवी व पदव्युतर पदविका अभ्यासक्रमाच्या विदयार्थ्यांची संख्या 10 वरुन 30 व डॉक्टरेटकरिता 10 विदयार्थी अशी एकूण 40 विदयार्थी संख्या वाढविण्यांत आलेली आहे. (प्रत सोबत जोडली आहे)

Scanned by CamScanner

तसेच सर्व अकृषि विद्यापीठे, संस्था, शासकीय, अनुदानित, विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये यांना सुचित करण्यात येते की, सदर योजनेचा लाभ अधिकाधिक विदयार्थ्यांनी घेण्याच्या दृष्टीकोनातून या योजनेची माहिती सदर योजनेच्या वाढीव जांगाच्या तपशीलासह आपल्या स्तरावरुन विद्यार्थी व पालकांना देण्यात यावी.

(युवराज साळुंखे)
कनिष्ठ प्रशासन अधिकारी
उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल

प्रत:1. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई - 400 032 यांना माहितीस्तव सविनय सादर
2.डॉ. विनोद मोहितकर, प्र. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, 3, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक 1967, महाराष्ट्र राज्य, मुंबई
3.मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण , पणे यांना माहितीस्तव सविनय सादर

Scanned by CamScanner

गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मंजूर करण्याच्या विदयार्थी संख्येत वाढ करण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्रमांक : बैठक-२०२२/प्र.क्र.१८८/तांशि-४
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.
दिनांक: ३१ जुलै, २०२३.

वाचा : १) शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२१८/तांशि-४, दि.०४ ऑक्टोबर, २०१८.
२) शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०२०/प्र.क्र.११६/तांशि-४, दि.०६ सप्टेंबर, २०२१.
३) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय यांचे पत्र क्र.१७/तंशिसं/परदेशी शिष्यवृत्ती/२०२२/२११, दि.०२ डिसेंबर, २०२२.
४) दि.२१.०७.२०२३ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णय.

प्रस्तावना :-

उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" योजना ही संदर्भाधीन क्र.१ येथील दि.०४ ऑक्टोबर, २०१८ शासन निर्णयान्वये जाहीर करण्यात आलेली आहे. सदर योजनेतील लाभार्थ्यांच्या उत्पन्न मर्यादेत संदर्भाधीन क्र.२ येथील दि.०६ सप्टेंबर, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुधारणा करण्यात आलेली आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या दि.२७ सप्टेंबर २०२२ रोजीच्या बैठकीत खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय घटकातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी परदेशात पाठवावयाच्या विद्यार्थ्यांच्या संख्येत वाढ करण्याचा प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्याबाबत राज्य मंत्रिमंडळाचे निर्देश होते.

तद्अनुषंगाने तंत्र शिक्षण संचालनालयाने संदर्भाधीन क्र.३ येथील दि.०२ डिसेंबर, २०२२ च्या पत्रान्वये शासनास प्रस्ताव सादर केला. सदरचा प्रस्ताव राज्य मंत्रिमंडळ बैठकीच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आला असता त्यास संदर्भाधिन क्र.४ येथील दि.२१.०७.२०२३ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार पुढीलप्रमाणे शासन निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय :-

१. उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" योजना राबविण्यासंदर्भात संदर्भाधीन क्र.१ येथील दि.०४ ऑक्टोबर, २०१८ शासन निर्णयान्वये जाहीर करण्यात आलेल्या व लाभार्थ्यांच्या उत्पन्न मर्यादेसंदर्भात संदर्भाधीन क्र.२

Scanned by CamScanner

येथील दि.०६ सप्टेंबर, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुधारणा करण्यात आलेल्या धोरणानुसार जे निकष विहित करण्यात आलेले आहेत, त्याच निकषांनुसार सदरची योजना यापुढेही राबविण्यात यावी.

२. सदर योजनेकरिता संदर्भाधीन दि.०४ ऑक्टोबर, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या निकषांमध्ये शासनाच्या मान्यतेने परिस्थितीजन्य आवश्यक ते बदल करण्याचे अधिकार विभागास राहतील.

३. शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ पासून संदर्भाधीन दि.४ ऑक्टोबर, २०१८ शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या सर्व शाखांमधील पदव्युत्तर पदवी व पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांची संख्या १० वरुन ३० व डॉक्टरेटकरिता १० विद्यार्थी अशा एकूण ४० विद्यार्थ्यांची शाखानिहाय विभागणी खालीलप्रमाणे करण्यात येत आहे.

अ.क्र.	शाखा / अभ्यासक्रम	पदव्युत्तर पदवी व पदव्युत्तर पदविका		डॉक्टरेट	एकूण
		विद्यमान विद्यार्थी संख्या	प्रस्तावित विद्यार्थी संख्या		
१.	कला	०१	०३	०१	०४
२.	वाणिज्य	०१	०३	०१	०४
३.	विज्ञान	०१	०३	०१	०४
४.	व्यवस्थापन	०१	०३	०१	०४
५.	विधी अभ्यासक्रम	०१	०३	०१	०४
६.	अभियांत्रिकी / वास्तुकला शास्त्र	०४	१२	०४	१६
७.	औषधनिर्माणशास्त्र	०१	०३	०१	०४
	एकूण	**१०**	**३०**	**१०**	**४०**

४. या योजनेसाठी अपेक्षित असलेला रु.९.०० कोटी एवढ्या अतिरिक्त आवर्ती खर्चास शासन मान्यता देण्यात येत आहे. सदरचा खर्च हा खालील लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

मागणी क्र.डब्ल्यू-३,
मुख्य लेखाशिर्ष २२०३-तंत्रशिक्षण,
१०७, शिष्यवृत्त्या,
(००)(००)(१०) गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मंजूर करणे (कार्यक्रम) (२२०३ ३५५१)
३४, शिष्यवृत्ती/विद्यावेतने

पृष्ठ ४ पैकी २

Scanned by CamScanner